श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] भाद्रपद शके १८४५. [ अंक ७ वा.

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशयचपलम्॥



क्षणमिह सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांची बोध पद्धती... ... ... ... | १-२ |
| स्फुट विषय... ... ... ... ... ... | ४१-४८ |
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ६०-६३ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... ... | १२५-१५२ |


## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्राहकानां दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील व त्यामुळें जर ग्राहकानीं अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांनां पुन्हां अंक पाठविण्यात येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरा येते. इतक्या उशिरा पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न

# महाराजांची बोध पद्धती.

श्रीसाई महाराजांचा बोध शाब्दिक नसून प्राय: अनुभवद्वारा असे. ते कधींही कोणत्या गहन विषयावर प्रवचन करीत नसत. त्यांचा उपदेश बहुतेक नैतिक असे आणि तो तुटक वाक्यांच्या द्वारें असे. महाराज गोष्टी पुष्कळ सांगत. त्यांतल्या कांहीं निरनिराळ्या भक्तांच्या संबंधानें असत आणि त्या, त्या भक्तांना ताबडतोब किंवा प्रसंगानुसार पटत. कांही गोष्टी सर्व सामान्य बोधासाठींच असत. अशा गोष्टीचा अर्थ निरनिराळे भक्त आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें व परिस्थितिप्रमाणें करीत. यापैकी कांहीं गोष्टी यापुढें या मासिकांत देण्याचा विचार आहे. आजच्या लेखांत महाराज व्यक्तिशः अनुभवद्वारा कसा बोध देत असत आणि तो कसा ठसत असे याची कांहीं उदाहरणें देण्याचें योजिलें आहे. याचें एक उदाहरण श्री साईलीलेच्या सहाव्या अंकांत पहिल्याच पानावर दिलें आहे.

एकदा माझे दोन स्नेही वाड्यांत ख्रिस्तीधर्माविषयी बोलत होते. त्यांचें बोलण्याचा रोख त्या धर्मांतील दोष काढण्याकडे होता. त्या बोलण्यांत मींही सामील होऊन कांहीं दोषदर्शनपरच बोललो. नंतर थोड्याच वेळानें मी महाराजांचे दर्शनास गेलों.मी पायां पडूं लागतांच महाराजांनीं आपले पाय मागें आंखडून घेतले. या त्यांच्या कृत्यानें मला महाराजांच्या नित्याच्या उपदेशाची फिरून जाणीव उत्पन्न होऊन मी महाराजांची मनां- -च क्षमा मागितली. त्याबरोबर महाराजांनीं मला आपण होऊन म्हटले ...का, बैस" आणि आपले पाय पुढें केलें. महाराजांचा नित्याचा ...म्हणजे आपण कोणाला बरें म्हणूं नये आणि कोणाला वाईट ...ये. बरें म्हणण्याची प्रवृत्ति फार कमी असते. वाईट म्हणण्याचीच असते. गुणापेक्षां दोषाकडेच आपली दृष्टि विशेष जाते. म्हणून ...ला वाईट बोलूं नये अशा संबंधानेंच महाराजांचा कटाक्ष असे. एकदां हें तत्व महाराजांनीं इतक्या जोरदार तऱ्हेनें आणि अशा शब्दांनीं सांगितलें कीं ते शब्द व ती तऱ्हा वारंवार माझ्या पुढें उभी

राहतात. ते शब्द हे. महाराज म्हणाले " काका, तूं कोणाला वाईट म्हटलेंस की मला दुखणें येतें. " महाराज ' सर्वाठायीं आहेत ' म्हणजे सर्वव्यापी आहेत हें ज्याच्या मनाला पटेल त्याला या त्यांच्या शब्दांची सत्यता पटल्याशिवाय राहावयाची नाहीं. कोणालाही दुखवणें म्हणजे महाराजांना दुखवणें आहे. कबीर महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें " सब घटमे राम जागे, क्यौं किसका दिल दुखाना ".

एकदां कांहीं मंडळी वाडयांत बोलत बसली होती त्यापैकीं एका गृहस्थानें तेथें हजर नसलेल्या एका व्यक्तीची बरीच निंदा चालविली. ती निंदा श्रोत्यांना रुचली नाहीं; पण कोणी कांहीं त्याबद्दल उद्गार काढला नाहीं. थोडयाच वेळानें निंदा करणारे गृहस्थ बहिर्दिशेला गेले. ते गेल्यानंतर थोडयाच वेळानें महाराज लेंडीवर जाण्यास निघाले. महाराज वाडयापाशीं आले तेव्हां वाडयांतील मंडळी महाराजांचे दर्शनास गेली. महाराजांनीं त्या निंदा करणाऱ्या गृहस्थाविषयीं विचारलें " * * * कोठे आहे ?" मी म्हटलें ते बहिर्दिशेला गेले आहेत. महाराज नुसते ' बरे ' एवढें बोलले. ते गृहस्थ परत आल्यावर मी त्यांना सांगितलें कीं महाराजांनीं आपल्याबद्दल विचारलें होतें. तेव्हां ते म्हणाले महाराज मला भेटले. त्यांनीं मला एक डुकर दाखविलें, त्याचे तोंड सगळें मळानें भरलें होतें व तो तें मोठया आवडीनें चाटीत होता. महाराज मला म्हणाले "पहा तो किती प्रेमानें खातो आहे पण आपल्याला त्याची किळसच येतें. असेंच कोणी दुसऱ्याची निंदा करूं लागला कीं ती त्याला गोड लागतें. ऐकणाऱ्याला ती रुचत नाहीं: आणि ती वाईटच. कशाला कोणाची निंदा करावी. "

सारांश महाराज वारंवार अनुभव देऊन आपलें अंतर्साक्षित्व पटवीत त्या मुळें मनावर साहजिकच एक तऱ्हेचा दाब उत्पन्न होऊन अंत:करणाच्या शुद्धीला मदत होत असे.

# गुरुपौर्णिमेचा उत्सव.

दर वर्षाप्रमाणें गेल्या आषाढ शुद्ध पौर्णिमेस शीर्डीस हा उत्सव मोठ्या थाटानें झाला. आषाढी एकादशीपासून साई महाराजांची भक्त-मंडळी शीर्डीस जमूं लागली. नागपुर, खांडवा, हरदा, ग्वाल्हेर, नाशीक, मुंबई, डाहणु पुणें वगैरे ठिकठिकाणची भक्तमंडळी उत्सवाकरितां आली होती. यंदा महाराजांच्या पदरीं असलेले दोघे गवई मुद्दाम उत्सवा-करितां येवल्याहून आले होते. येणाऱ्या मंडळींकरितां गाड्यांची व्यवस्था शीर्डीहून करण्यांत आली होती त्यामुळें मंडळींचा कोपरगांव ते शीर्डी-पर्यंतचा प्रवास बराच सुखकर झाला. उत्सवाचें वर्णन देण्यापूर्वी हा उत्सव शीर्डीस प्रथम केव्हां व कसा सुरूं झाला त्याची माहिती वाचकानां मनोरंजक वाटेल म्हणून ती आम्हीं थोडक्यांत येथें देत आहोत.

प्रत्येक पंचांगांत आषाढ शुद्ध पौर्णिमा हा व्यासपूजेचा दिवस म्हणून देण्यांत येतो. श्री व्यासांच्या कालांपासून ह्या दिवशीं गुरुंची पूजा करून गुरूनां वस्त्रें देण्याची वहिवाट असल्याचा दाखला पुराणांतरीं सांपडतो. शीर्डीस गुरुपौर्णिमेची पूजा ही महाराजानींच स्वतः आपल्या नेहमीच्या पद्धति प्रमाणें अपरोक्ष मार्गानें सुचविली. सन १९०८ सालीं रा. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नुलकर, सबजज, पंढरपूर हे रजा घेऊन शिर्डीस येऊन राहिले होते. त्यावेळीं त्यांचा मुक्काम गांवच्या चावडींत होता. एके दिवशीं सकाळीं महाराज रा. माधवराव देशपांडे यांचे जवळ म्हणाले कीं त्या म्हाताऱ्याला म्हणावें या खांबाची पूजा कर. तात्यासाहेब नुलकरांना महाराज म्हातारा म्हणत असत व पूजेकरितां जो खांब महाराजानीं दाखविला तो धुनी-जवळ असून त्याला टेकून कित्येक वेळां महाराज बसत असत. माधवरा-वांनीं तो निरोप तात्यासाहेबांना सांगितला. या वेळीं रोजची पूजा किंवा आरति शीर्डीस सुरूं झालेली नव्हती. नुलकरांनां व माधरावानां हा काय प्रकार आहे ते प्रथम लक्षांत येईना. नुलकरांनीं पचांगांत कांहीं खुलासा मिळतो की काय तें बघण्याकरितां पंचांग पाहिलें.तेव्हां तो दिवस व्यास-पूजेचा म्हणजे गुरुपूजेचा आहे असें आढळून आलें. अर्थात अशा मह-

त्याच्या दिवशीं महाराजांच्या आज्ञेनें खांबाची कां होईना पण मशिदींत पूजा करण्याचा योग आल्यामुळें त्यानां परमानंद झाला.माधवराव पुन्हां मशिदींत गेले तेव्हां महाराज त्यानांही म्हणाले की तोच काय एकटा पुजा करतो; तुलाही करायला काय झालें. महाराजांची व माधवरावांची विशेष सलगी असल्यामुळें हें ऐकून माधवरावानीं सांगितलें कीं आपण खांबावीत्राची पूजा नाहीं करणार, जर तुम्हीं करूं द्याल तर तुमची मात्र पूजा करीन. महाराज थोडेच एकदम होय म्हणणार. शेवटीं नाहीं होय करतां महाराजांची पूजा करण्याची परवानगी मिळाली. त्यावेळीं तेथें असलेलें प्रेमांतले भक्त म्हणजे तात्या कोंते पाटील व दादासाहेब केळकर. दादासाहेबांना तो गुरुपौर्णिमेचा दिवस व त्या पूजेची माहिती होती. तात्यापाटील शेतावर गेले होते त्यांना बोलावून आणिलें. मंडळींनी पूजेचें सामान तयार केले, धोतरें आणविलीं व सर्वांनीं प्रत्यक्ष महाराजांची पूजा करून त्यांना वस्त्रें दिली. अर्थात त्या वस्त्रांचा महाराजास कांहीं उपयोग नव्हताच परंतु आपल्या भक्तमंडळीना गुरु पौर्णिमेस गुरूंची पूजा करण्याचा योग यावा व पुढें तो परिपाठ चालू रहावा या करतांच हे सर्व लाघव महाराजांनीं केलें.अशा रितीनें ही पूजा सुरू झाली व नंतर या समारंभास हलकें हलकें मोठया उत्सवाचें स्वरूप आलें.

महाराजांचे वेळीं हा उत्सव फारच थाटाचा होत असे. महाराजांनीं देह ठेवल्यानंतर वार्षिक उत्सवाच्या ज्या वाटण्या झाल्या त्यांत हा उत्सव महाराजांचें परम भक्त कै. श्रीमंत गोपाळराव उर्फ बापूसाहेब बुटी यांचेकडे देण्यांत आला. त्याप्रमाणें त्यांनी आपल्या हयातींत तो चालविला. त्यांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव श्रीमंत केशवरावभय्या व पूर्णचंद्रभय्या हेही तितक्याच उल्हासानें तो उत्सव चालवीत आहेत हें त्यांनां फार भूषणावह आहे. श्री. पूर्णचंद्रभय्या सहकुटुंब उत्सवास आले होते व पहिली महापूजा त्यांचे हातून झाली.

यंदा आषाढ शुद्ध एकादशीपासूनच शीर्डीस उत्सवाचें स्वरूप थोडेसें दिसूं लागलें. महा एकादशी म्हणून रात्रीं महाराजांची पालखी भजनी दिंडीसह वाजत गाजत गावांत मिरविली. दुसरें दिवशीं मुसलमान लोकांचा ईदीचा सण होता. त्या दिवशीं सकाळीं ५०।७५ मुसलमान मंडळी प्रथम मशिदींत जमून प्रार्थना केल्यानंतर समाधि मंदीरांत येऊन

दर्शन घेऊन गेली. श्री साईमहाराजांचे कृपेनें हिंदु व मुसलमान बंधु-त्वाच्या नात्यानें कसे वागतात व एकाच वेळीं आलेले आपआपले सण एकाच जागेंत तंटा फिसाद न करितां कसें आनंदानें पार पाडतात, याचें उत्कृष्ट उदाहरण शींर्डीबाहेर क्वचितच पाहण्यास सांपडेल.

गुरु पौर्णिमेच्या दिवसाची पहाट उजाडली व नित्य नियमाप्रमाणें काकडार्तिची घंटा झाल्याबरोबर सर्व भक्त मंडळी खडबडुन उठून काकडार्तिला हजर झाली. काकडार्ति संपवून सर्वजण शुचिर्भूत होण्याचे तयारीला लागले. अभिषेकांकरितां मुद्दाम वैदिक ब्राह्मण बाहेरून बोला-विले होते, त्यांनीं सकाळ पासून समाधिवर लघुरुद्राच्या अभिषेकास सुर-वात केली. ब्राम्हणाकरवी कित्येक भक्त मंडळीनीं आपआपल्या नांवाचें समाधिवर रुद्राभिषेक करविले. अभिषेक सुमारें १०॥-११ वाजतां संपले. नंतर सर्व भक्त मंडळींनीं जमून प्रत्येकानें आपल्या हातानें मंगल वाद्यांच्या गजरांत, समाधीला पंचामृत स्नान, गंगास्नान व उष्णोदकाचें अभ्यंगस्नान घातलें. नंतर समाधि कोरडी करून गलेफ चढविण्यांत आले व भक्त मंडळींच्या पूजा सुरू झाल्या. सर्वांनीं आपआपली पूजा करून सद्गुरुनां शेरे, हार व वस्त्रें वाहिलीं. शेवटीं आरति होऊन प्रसाद वाटण्यांत आला व पूजेचा समारंभ सुमारें २ वाजतां संपला.

तिसऱ्या प्रहरीं समाधिपुढें पुराण झालें व सायंकाळीं गायन झालें. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली. हा रथ एका भक्तानें ५।६ वर्षांपूर्वी शीर्डीस आणून महाराजांना अर्पण केला होता. रथ आल्यावर रथाची मिरवणूक काढण्याची परवानगी महाराजांजवळ वरेच वेळां मागण्यांत आली परंतु महाराज म्हणत कीं रथ अवजड आहे, कोणाला इजा होईल. कोणी त्या खालीं चिरडेल. तेव्हां महाराजांची परवानगी नाहीं असें सम-जून रथाची मिरवणुक काढली गेली नाहीं व रथ तसाच दोन तीन साल पर्यंत मशीदींपुढील सभामंडपांत पडून राहिला होता. रथ आला त्यावेळीं त्यांतील सामान म्हणजे गजनीच्या व किनखावाच्या गाद्या, लोड सरपोस, तक्के वगैरे सामान ही आलें होतें. महाराज स्वतः कोणत्यांही वाहनाचा उपयोग करीत नसत. परंतु जसा त्यांचा घोडा ( हा ही एका भक्तानेंच कांहीं वर्षांपूर्वी अर्पण केला होता ) आरतीचें वेळीं साज चढ-वून रोज सभामंडपांत आणीत असत; त्याच प्रमाणें रथांत आरतीचे-वेळीं गाद्या, लोड, वगैरे सामान ठेवण्याची वहिवाट असे.

महाराजांच्या हयातीतील झालेल्या शेवटच्या गुरु पौर्णिमेच्या दिवशी मात्र महाराजानीं रथ मिरविण्याची परवानगी दिली. त्या दिवशी तिसऱ्या प्रहरीं रथांत महाराजांची तसबीर व पादुका ठेवून रथाची थाटाची स्वारी गावांत मिरविली होती. या मिरवणुकीबरोबर जाण्याची आज्ञा सर्व भक्त मंडळास महाराजानीं स्वतः दिली होती. महाराजांच्या हयातीत पहिली व शेवटची रथाची हीच मिरवणुक झाली. असो.

रथाची मिरवणुक रात्रीं १० वाजतां मशिदीतून निघाली. आघाडीला नळे चंद्रजोती उडत होत्या. त्यांच्या मागें बेंडबाजा ताशे व वाजंत्री वाजत होते. त्यांच्या मागें भजनी दिंडीचा गजर चालला होता. नंतर महाराजांचा घोडा व रथ अशा क्रमानें मिरवणुक निघाली. रथाच्या बाजूला व मागें भक्त मंडळी छत्र चामरें अब्दागिर वगैरे घेऊन चालली होती. गावांतील भक्त मंडळींच्या दरवाज्यापुढें रथ थांबवुन सवाष्णी येऊन पूजा व औक्षण करीत. मिरवणुक महाराजांचे परमभक्त भ. म्हाळसापति उर्फ भगत यांचे घरापुढें आल्यावर थांबून, बराच वेळ दिंडीच्या भजनी मंडळीचे भजन झालें. मिरवणुक पुन्हां सुरु होऊन रा. दिक्षितांच्या वाड्या-समोर थांबली. तेथें पुन्हां भजन व गारुड ( हें गारुड एकनाथ महाराजानी रचलेलें आहे ) म्हणणें होऊन मिरवणुक सुमारें ४ तासानी मशिदींत परत आली, नंतर समाधि गृहांत शेजारती होऊन प्रथम दिवसाचा कार्यक्रम संपला.

दुसरे दिवशी उत्सवाप्रीत्यर्थ गरीब लोकांना भोजन दिलें. सुमारें १००० पान जेऊन उठलें. रात्रीं मशिदीच्या सभामंडपांत वारकरी पंथाचें हरिकीर्तन झालें. कीर्तन संपल्यावर महाराज ज्या थाटानें एक दिवसा आड चावडींत निजण्यास जात असत त्याच थाटाची मिरवणुक काढून पालखी चावडींत नेली व तेथें शेजारति झाली.

तिसरे दिवशी सकाळी समाधिपुढें काल्याचें कीर्तन, व निरनिराळे काल्याचे खेळ होऊन दही हंडि फुटली व गोपाळकाला होऊन उत्सव समाप्त झाली.

वार्षिक शिरस्त्या प्रमाणें तात्या पाटलानीं पाहुणे मंडळीनां आपल्या घरीं बोलावून पार्टी दिली व नंतर उत्सवास आलेली मंडळी सवडी प्रमाणें परत रवाना झाली.

---

रा. रा. निळकंठराव सहस्त्रबुद्धे यांनी ता० १६।८।२३ रोजी पाठविलेलें पद.

## सच्चिदानंद सद्गुरु समर्थ श्रीसाईनाथ प्रसन्नोस्तु.

साईदर्शना जावें ऐसा विचारही मन्मनीं,
नसतां नेलें मज खेचुनी ॥ १ ॥

शिरडीग्रामीं, नाना[1] काका[2] ह्या उभयां प्रेरुनी,
कृपा ही बहुतचि वाटे मनीं ॥ २ ॥

संशय छेदुनि मनिचे सारे निजस्वरुपा दावुनी,
घेतलें निजपदिं मज ठेवुनी ॥ ३ ॥

संतदर्शनें पूर्वी झालीं होतीं त्यांचें फळ,
मिळालें आतां नच तळमळ ॥ ४ ॥

तव आज्ञेनें तव भक्ता[3] सेवा घडली बरी,
तितुकिच समजुनि बहु चाकरी ॥ ५ ॥

उपकृत होसी म्हणुनी सखया सुदाम्यासी तो हरी,
तैसा गमसी मम अंतरीं ॥ ६ ॥

उदारता ही कैशी वर्णू निवर्तते वैखरी,
न दिसे कोठें तुजसी सरी ॥ ७ ॥

पतीतपावन ब्रीद तुला या यथार्थ साजे वरें,
काय तें वर्णावें पामरें ? ॥ ८ ॥

नीलकंठ हा तवपदिं राहो अखंड ऐशा वरा,
दयाळा देई निजकिंकरा ॥ ९ ॥

---

१. नानासाहेब चांदोरकर. २. भाऊसाहेब दीक्षित. ३. तात्यासाहेब नूलकर.

गेल्या गुरुपौर्णिमेस खालील पद एका *भक्ताकडून आलें होतें. व तें पूजा झाल्यावर, समाधीपुढें म्हणण्यांत आलें.

पद.

मायातीता गुणरहिता तुज वंदन निष्कामा ॥
सद्गुरु ताता साईनाथा भक्ता सुखधामा ॥ १ ॥
आषाढीला नित्यहि यावें ध्यावें पद्युग्मा ॥
दैवहिनाला योग न आला साई सुख सद्मा ॥ २ ॥
खंत मनाला उसंत नाहीं भवचक्रीं पडतां ॥
गुरु गजानन पद्युगलें ही देती निर्भयता ॥ ३ ॥
साई गजानन ऐक्यरुपांतच चित्तीं नित गणतां ॥
तुम्हा उभयता एक मानुनी ध्यावें ही चिंता ॥ ४ ॥
चिंतामग्ना गुरुपद तारक असती अघहंता ॥
सद्गुरुनाथा सदया आतां सन्निध तूं असतां ॥ ५ ॥
विकल्पभीती लेशहि नुरतीं शांती ये चित्ता ॥
आषाढीला पूर्ण चंद्रमा भावें पद पुजतां ॥ ६ ॥
नागपुराहुन मानसपूजा अर्पियली ताता ॥
निष्कामत्वें मानुन हिजला पदरीं घ्या आतां ॥ ७ ॥
हृत्कमळाचें सिंहासन तुज दिधलें वैसाया ॥
नेत्रोद्भव जल विपुळ आणुनी धुतली तव काया ॥ ८ ॥
शुद्धभावना चंदनगंधा लावुन तव पाया ॥
मनसुमनासह त्रिगुण बिल्व तुज पुढती अर्पाया ॥ ९ ॥
भक्तीरूपी अग्नीमध्यें वासना धूप ॥
संसृतिस्नेहीं गूण भिजवुनी लावियला दीप ॥ १० ॥
पंच प्राणा उजळुन आतां आरति ओंवाळूं ॥
म्हणजे येइल धांवत अमुचा सद्गुरु कनवाळू ॥ ११ ॥
ईश्वरि सत्ता व्यापक जगता गुरुरुपें आली ॥
निळकंठाची मनोकामना परीपूर्ण केली ॥ १२ ॥
सद्गुरुठायीं प्रेमा हाची अर्पूं नैवेद्य ॥
त्रयोदशगुण तांबुल घाना हें तेरा पद्य ॥ १३ ॥

* निळकंठराव घटी नागपूरकर

( २६ )

महाराजांनीं शिर्डीस देह ठेविला त्याच रात्रीं पार्ल्यास माझा पुतण्या चि. माधव यास स्वप्न पडलें कीं नाशकास एका मोठ्या योग्यानें समाधी घेतली. तसेंच एका मुंबईस रहाणाऱ्या हिंदुस्थानी हनुमान प्रसाद नांवाच्या जोशाच्या येथें महाराजांची तसबीर होती ती एकाएकीं हालूं लागली. याच प्रमाणें महाराजांच्या ठिकठिकाणच्या मुख्यमुख्य भक्तांपैकीं पुष्कळांना कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारानें महाराजांनीं आपल्या समाधीची सूचना दिली.

महाराजांनीं देह ठेवण्याच्या दोनतीन मिनिटें आधीं 'मला वाड्यांत घेऊन चला असे शब्द काढिले.' देहावसान झाल्यावर महाराजांचा देह कोठें ठेवावयाचा या विषयीं मंडळी विचार करूं लागली. वरील शब्दांचा आधार घेऊन कांहीं मंडळी असें म्हणूं लागली कीं महाराजांनीं वाड्यांत नेण्याविषयीं म्हटलें होतें याचा अर्थच हा कीं महाराजांची समाधी बापु साहेब बुटींच्या वाड्यांत व्हावी, उलट कांहीं मंडळी म्हणूं लागली कीं महाराजांच्या देहाला खासगी वाड्यांत न ठेवितां कोठेंतरी खुल्या जागेंत त्यांची समाधी व्हावी. याबद्दल एक दिवस लढा पडून शेवटीं महाराजांना बापुसाहेबांच्या वाड्यांतच समाधी द्यावयाची असें सर्वानुमतें ठरलें व त्याप्रमाणेंच झालेंही. हा वाडा पहिल्यानें बापुसाहेब बुटींना राहण्यासाठीं म्हणून योजिला होता. वाड्याचें कांहीं काम झाल्यावर सन १९१६ च्या दिसेंबर मध्यें महाराज अजारी पडले तेव्हां नानासाहेब चांदोरकरांना अशी स्फूर्ति झाली कीं हा केवळ खासगी वाडा व्हावयाचा नसून यांत देऊळ असावें. महाराजांना या संबंधानें विचारतां त्यांनीही देऊळ करण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें मधला भाग देऊळाचा करून बाकीचा राहण्याचा भाग करावा असें ठरलें. देउळासाठीं कारागीर नागपुराहून बोलाविले. त्यांनीं कांहीं काम केलें व त्यांना एकाएकीं कांहीं कारणास्तव परत जावें लागलें; तेव्हां देऊळाचें काम शिल्लक राहून बाकीचें काम चालू केलें. देऊळाचें काम महाराजांच्या देहावसाना पर्यंत तसेंच पडून राहिलें व त्यामुळें त्या भागांत महाराजांची समाधी

करितां आली. अर्थात तें महाराजांचेंच देऊळ झालें. ही आपलीच जागा आहे व आपण येथेंच राहूं असें महाराज कैक वर्षें नित्य म्हणत असत.

महाराजांच्या आशिर्वादानें शेकडो निपुत्रिक लोकांना पुत्र संतती होऊन ते आनंदांत आहेत. रावबहादुर हरि विनायक साठे, नगरचे दामुशेट कासार, नांदेडचे रतनजीशेट, गोपाळ गुंड, रावेरचे देशमुख ही सर्व मंडळी महाराजांचे दर्शनास पुत्र प्राप्तीचे इच्छेनें आली आणि महाराजांच्या कृपेनें या सर्वांना मुलें होऊन तीं सुखरूप आहेत. पण या शिवाय गरीब गुरीबांमध्ये असे हजारों लोक सांपडतील कीं ज्यांना महाराजांच्या आशिर्वादानें मुलें झाली आहेत. रामनवमीच्या यात्रेंत तर मुले मागणाऱ्या बायका अतोनांत येत इतकेंच नव्हे तर दर गुरुवारीही येत. कित्येक बायका येथें न येतां आपल्या घरींच महाराजांना नवस करीत आणि महाराज नवसांना पावत. पुण्यांस अशीच एक बाई पुत्रासाठीं आतुर असून तिनें महाराजांना नवस केला. त्यानंतर लौकरच महाराज तिच्या स्वप्नांत गले आणि तिला आशिर्वाद देऊन तिच्या हातांत नारळ दिला. बाई जागी होऊन पहाते तों नारळ खरोखरच तिच्या आंथरूणाजवळ ठेविलेला तिला दिसला. तिला अर्थात अती आनंद झाला, व योग्य वेळीं प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. मुलगा वर्षाचा झाल्यावर ती त्याला येथें घेऊन आली आणि महाराजांच्या पायांजवळ त्याचे जावळ उतरवीलें. महाराजानी कोणत्याची पुत्रेच्छु बाईला फळ दिलें कीं तिला मुलगा होणारच असा सर्वांचा अनुभव असे. इतकेंच नव्हे तर महाराजानीं समाधी घेतल्यावरही कित्येक बायांनी महाराजांना नवस केल्यानें त्यानां मुलं झाल्याचीं उदाहरणें आहेत. याचें ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे एक जगन्नाथ नावाचा मनुष्य येथें महाराजांच्या घोड्याची चाकरी करण्याऱ्या कामावर होता. तो पुढें बुवा बनला व पनवेल तालुक्यांत उळवे नांवाचे गांवीं शंकराचें देवळांत बसला. तो तेथें असतांना तेथील शंकररावजी शेट यांची स्त्री सौ. उमाबाई इची ओळख झाली. शंकररावाला पुत्र संतती नसल्यामुळें त्यांनीं उमाबाईचें आग्रहानें दुसरें लग्न केलें. त्या कुटुंबालाही संतती होईना. एके दिवशीं जगन्नाथानें उमाबाईचें सांगण्यावरून तिच्या सवतीच्या ओटींत नारळ घातला आणि

तिला सांगितलें कीं जर हिला मुलगा झाला तर तुम्ही महाराजांचें समाधीचे दर्शनास जावें. त्या प्रमाणें तिनें नवस केला तो असा. जर माझ्या सवतीस मुलगा झाला तर मी तुमच्या दर्शनास येईन. नवस केल्यापासून एक वर्षाचे आंत त्या बाईस मुलगा झाला. तो नवस फेडण्यासाठीं उमाबाई येथें आली होती. जगन्नाथानें पुढें उळवें गांव सोडला पण ज्यावेळेस उमाबाई येथें दर्शनास आली त्यावेळेस तोही येथें अकस्मात आला होता. उमाबाईनें येथें एक नारळ वाहिला त्याचे शेंडीस पावली-भार सोन्याचा मिठाचे आकाराचा दाणा करवून वांधलेला होता. तो नारळ येथें श्री संस्थानचे कोठींत आहे.

(२७)

एका गृहस्थाचा मुलगा कांहीं वर्षें नाहींसा झाला होता. तो गृहस्थ महाराजांकडे गेला व मुलाबद्दल प्रार्थना केली. महाराज म्हणाले तो तुला लौकरच भेटेल. दोन दिवसांनी त्या गृहस्थाला घरीं येण्याची परवानगी दिली. तो गृहस्थ ठाण्यास राहत असे. तो ठाण्याचा स्टेशनावर उतरला तर त्याच वेळेस मुंबईकडील गाडी आली व त्याच गाडींतून त्या गृहस्थाचा मुलगा उतरला. अर्थात् महाराजांकडून परततांच आपल्या गांवीं आपल्या बरोबर स्टेशनावरच बापलेकाची भेट झाली.

(२८)

एकदां माधवराव देशपांडयांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत महाराज आले व ह्मणाले 'गोवर्धनदासाकडे गेला होतास का? त्याची आई वारली. त्याच्याकडे आपल्याला गेलें पाहिजे." त्या प्रमाणें माधवराव तिसरे प्रहरी गोवर्धनदासाकडे गेले तों तेथें कळलें कीं त्यांची आई एक दोन दिवसांपूर्वी वारली.

(२९)

रा. रा. द्वारकानाथ प्रधान हे एकदां महाराजांचे दर्शनास गेले होते. व त्यांनीं आपल्या सासऱ्याकडून एक पत्र महाराजांचे नांवानें नेलें होतें. तें पत्र द्वारकानाथांनी महाराजांजवळ दिलें. महाराजांनीं पत्र उलटें

धरलें व ते म्हणाले " जात्ये कां. " महाराजांचे शब्द मी ऐकले पण दुसऱ्या मंडळींनी ऐकले नाहींत मग पत्र वाचून दाखवावयाला सांगितलें. पत्रांत द्वारकानाथाची बायको अजारी असल्याबद्दल मजकूर होता. पत्र वाचलें गेल्यावर द्वारकानाथांनी विचारलें 'कुटुंबाला कधीं येथें आणतां?' महाराज म्हणाले 'चार दिवसांनीं येईल' त्यानंतर बरोबर चार दिवसांनीं वाई वारली. मंडळीला आश्चर्य वाटलें पण महाराजांचे पहिले शब्द ऐकले होते म्हणून मला झालेल्या गोष्टीचें नवल वाटलें नाहीं.

३०

एका गुरूपौर्णिमेच्यावेळीं रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर उर्फ अण्णासाहेब हे सहकुटुंब शिर्डीस गेले असतां त्यांचेजवळचे पैसे संपले. पुढें एक दोन दिवसांनीं रा. रा. हरी सिताराम दीक्षित व मोरेश्वरराव प्रधान हे शिर्डीस गेले. प्रधानाचे रुपये दुसरे दिवशींच संपले. महाराजांनीं पुन्हां प्रधाना जवळ दक्षिणा मागितली. ते म्हणाले पैसे नाहींत. तेव्हां महाराज म्हणाले त्या अण्णासाहेबांकडे जाऊन माग. आदले दिवशीं कांहीं वेळपर्यंत अण्णासाहेबांकडेंही पैसे नव्हते असा सर्वांचा समज होता आणि तो खराही होता. तरी पण बाबांची आज्ञा म्हणून प्रधान त्यांजकडे मागावयास गेले. प्रधान पैसे मागूं लागले हें पाहून अण्णासाहेबांस आश्चर्य वाटलें. कारण त्यांनीं घरून (वांद्र्याहून) मागविलेली व त्याच दिवशीं थोडावेळ आधीं एका गृहस्थानें त्याजला आणून दिलेली रक्कम तिसरे कोणासच ठाऊक नव्हती. अण्णासाहेब प्रधानास म्हणाले 'मजकडे आतांच रक्कम आली हें तुम्हांस कसें कळलें!' तेव्हां ते म्हणाले 'मला काय ठाऊक ! मला बाबांनीं पाठविलें म्हणून मी आलो. " अर्थात महाराजांनां सर्व कळतें त्याचा हा प्रत्यय आला.

# अध्याय ७ वा.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
॥ श्रीसद्गुरुसाईनाथायनमः ॥

आतां पूर्वकथेची संगती । स्मरणपूर्वक आणूं चित्तीं ॥
देउळांच्या जीर्णोद्धारार्थीं । कैसी प्रीति बाबांस ॥ १ ॥
परोपकारार्थ कैसे श्रमत । कैसे निजभक्त सांभाळीत ॥
कैसा निजांगें देह झिजवीत । दुःखेंही सोशीत भक्तांचीं ॥ २ ॥
समाधी समवेत खंडयोग । धोती पोती इत्यादि प्रयोग ॥
कदा करपदशिरवियोग । कदा संयोग पूर्ववत् ॥ ३ ॥
हिंदू म्हणतां दिसत यवन । यवन म्हणतां हिंदू सुलक्षण ॥
ऐसा हा अवतार विलक्षण । कोण विचक्षण वर्णील ॥ ४ ॥
जात हिंदू कीं मुसलमान । थांग न लागला अणुप्रमाण ॥
उभय वर्गां समसमान । जयांचें वर्तन सर्वदा ॥ ५ ॥
रामनवमी हिंदूंचा सण । करवीतसे स्वयें आपण ॥
सभामंडपीं पाळणा बांधवून । कथा कीर्तन करवीत ॥ ६ ॥
चौकांत सन्मुख लागे पाळणा । करवूनि घेती रामकीर्तना ॥
तेंचि रात्रीं संदल मिरवणा । अनुज्ञा यवनांही देत ॥ ७ ॥

जमवून जमतील तितुके यवन। समारंभें संदल मिरवण ॥
उभय उत्सव समसमान। घेत करवून आनंदें ॥ ८ ॥

येतां रामनवमीचा दिवस। कुस्त्या लावण्याची हौस ॥
घोडे तोडे पगडया बक्षीस। अति उल्हास द्यावया ॥ ९ ॥

सण गोकुळअष्टमी आला। करवून घेती गोपाळ काला ॥
तैसीच ईद येतां यवनांला। निमाजाला अटकना ॥ १० ॥

एकदां आला मोहरमाचा सण। आले मशीदीस कांहीं यवन ॥
म्हणती एक ताजा बनवून। करूं मिरवण ग्रांमांत ॥ ११ ॥

आडेसरसा ताजा झाला। चार दिवस ठेवूंही दिधला ॥
पांचवे दिवशीं खालीं काढिला। नाहीं मनाला सुख दुःख ॥ १२ ॥

अविंध म्हणतां विंधितक... ...हिंदू म्हणता सुंता प्रमाण ॥
ऐसा ना हिंदू ना यवन। अवतार पावन साईचा ॥ १३ ॥

हिंदू म्हणावें जरीं तयांस। मशीदींत सदां निवास ॥
यवन म्हणावें तरी हुताश। अहर्निश मशीदीं ॥ १४ ॥

मशीदींत जात्याचें दळण। मशीदींत घंटाशंखवादन ॥
मशीदींत अग्निसंतर्पण। मुसलमान कैसे हे ॥ १५ ॥

मशीदींत सदैव भजन। मशीदींत अन्नसंतर्पण ॥
मशीदींत अर्घ्य-पाद्य-पूजन। मुसलमान कैसे हे ॥ १६ ॥

म्हणावी जरी म्लेंच्छ जाती। ब्राह्मणोत्तम पूजन करिती ॥
अग्निहोत्री लोटांगणीं येती। त्यागूनि स्फीती सोंवळ्याची ॥ १७॥

ऐसे जन विस्मित चित्तीं। पाहूं येती जे जे प्रचीति ॥
तेही तैसेंच आपण वर्तती। मूग गिळिती दर्शनें ॥ १८ ॥

तरी जो सर्वदा हरीसी शरण। त्या काय म्हणावें हिंदु वा यवन॥
असो शूद्र अतिशूद्र यातीविहीन। जाती न प्रमाण अणुमात्र॥ १९॥

नाहीं जयास देहाभिमान। असो हिंदू वा मुसलमान॥
सकल वर्णा समसमान। तया न भिन्नपण जातीचें॥ २०॥

फकीर पंक्तीसी मांस भोजन। अथवां यदृच्छा मत्स्यसेवन॥
तेथेंच तोंड घालितां श्वान। विटे न मन जयाचें॥ २१॥

चालूवर्षाचा धान्याचा सांठा। कृषीवळ करितो बांधोनि मोटा॥
कीं पुढील सालीं आलिया तोटा। वेळीं पुरवठा होईल॥ २२॥

तसें संग्रहीं गव्हांचें पोतें। दळाया मशीदींत असे जातें॥
पाखडावया सूपही होतें। न्यून नव्हतें संसारास॥ २३॥

सभामंडपीं शोभायमान। सुंदर खासें तुलसी वृंदावन॥
तेथेंच एक लांकडी स्यंदन[1]। अति सुलक्षण कांतीव॥ २४॥

होतें कांहीं पुण्य गांठीं। तेणें या सद्वस्तूची झाली भेटी॥
ऐशी दृढ सांठवा हृदय संपुटीं। पडेना तुटी आमरणांत॥ २५॥

कांहीं पूर्वार्जित सभाग्यता। तेणें हे पाय आले हाता॥
मनास लाभली शांतता। निश्चितता ही प्रपंचीं॥ २६॥

पुढें कितीही सुखसंपन्न। झालों तरी तें सुख नये परतोन॥
जें श्रीसाई समर्थ समागमजन्य। भोगितां धन्य झालों मी॥ २७॥

---

१ हा एक सुंदर, कातीव लांकडी रथ शिरडीस मशिदीचे मंडपांत असतो हा इंदूरचे बाबांचे प्रेमळ भक्त रा. रा. बाळासाहेब रेगे, दाजीसाहेब अवस्थी वगैरेंनीं उत्सवाचे दिवशीं गांवांत मिरवणूकीचेसाठीं संस्थानास अर्पण केला आहे.

स्वानंदैक चिद्धन साई । काय वानूं त्याची नवलाई ॥
जो जो रातला तयाच्या पायीं । तो तो ठायींच बैसविला ॥२८॥
अजिन दंडधारी तापसी । हरिद्वारादि तीर्थवासी ॥
तडी तापडी आणि संन्यासी । त्यागी उदासी बहु येती ॥ २९॥
बोले चाले हसे उदंड । जिव्हेस अल्ला मालीक अखंड ॥
नावडे वाद किंवा वितंड । निकट दंड[1] सर्वदां ॥ ३० ॥
तापस वृत्ति शमी दांत । वाचा स्त्रवे पूर्ण वेदांत ॥
कोणाही न लागला अंत । अखेरपर्यंत बाबांचा ॥ ३१ ॥
राव असो वा रंक । समसाम्य सकळां निष्टंक ॥
लक्ष्मी पुत्र वा भिकारी खंक। उभयांस एकचि माप तेथें ॥ ३२॥
कोणाचे बरें वाईट कर्म। जाणतसे जीवां आंतुलें मर्म ॥
सांगून देत खूण वर्म। आश्चर्य परम भक्तांना ॥ ३३॥
जाणपणाचें तें साठवण । नेणतपणाचें पांघरूण ॥
मान संपादन जयास शीण । एवं लक्षण श्रीसाई॥ ३४॥
काया जरी मानवाची । करणी अपूर्व देवाची ॥
शिरडींत प्रत्यक्ष देव तो हाची। भाविती हेंचि जन सारें ॥ ३५ ॥
काय बाबांचे चमत्कार। किती म्हणून मी वर्णूं पामर ।
देवा देउळांचेही जीर्णोद्धार। बाबांनीं अपार करविले ॥ ३६ ॥

---

१ हा दंड म्हणजे हात दीडहात लांब आणि चांगला पायाचे आंगठयाएवढा जाड असा मजबूत काळ्या लांकडाचा सटका जो बाबांचे पाशीं नित्य असे. मशिदींतून चावडींत जातांना आणि तेथून मशिदींत परत येताना बाबा एका हातांत त्यांची चिलीम व तंबाखूची पुरचुंडी आणि दुसरे हातांत हा त्यांचा सटका असें बरोबर घेऊन नित्य जात व येत.

शिरडीस तात्या पाटीला हातीं। शनी गणपती शंकरपार्वती ॥
ग्रामदेवी आणि मारुती। यांचीही सुस्थिती लाविली ॥ ३७ ॥

लोकांपासूनि दक्षिणामिषें। घेत असत बाबा जे पैसे ॥
कांहीं धर्मार्थ वाटीत जैसें। कांहीं तैसेच ते देत ॥ ३८ ॥

कोणास रोज रुपये तीस। कोणास दहा पंधरा, पन्नास ॥
ऐसें मन मानेल तयांस। वांटीत उल्हास वृत्तीनें ॥३९॥

हा तो सर्व धर्माचा पैसा। घेणारासही पूर्ण भरंवसा ॥
विनियोगही व्हावा तैसा। हीच मनीषा बाबांची ॥ ४० ॥

असो कित्येक दर्शनें पुष्ट। कित्येक झाले दुष्टांचे सुष्ट ॥
कित्येकांचें गेलें कुष्ट। पावले अभीष्ट किती एक ॥ ४१ ॥

न घालितां अंजन पाला रस ॥ कितीक अंध झाले डोळस ॥
आले पाय कितीक पंगूंस। केवळ पायांस लागतां ॥ ४२ ॥

महिमा तयांचा अनिवार। कोणा न लागे तयांचा-पार ॥
यात्रा येऊं लागली अपार। अपरंपार चौबाजू ॥ ४३ ॥

धुनी निकट तेच स्थानीं। मलमूत्रातें विसर्जूनी ॥
कधीं पारोसें कधीं स्नानीं। नित्य ध्यानीं निरत जे ॥ ४४ ॥

डोईस सफेत पागोटें खासें। स्वच्छ धोतर लावीत कासे ॥
अंगांत सदरा कीं पैरण असे। पेहराव ऐसा आरंभीं ॥ ४५ ॥

आरंभीं गांवीं वैद्यकी करीत ॥ पाहून पाहून दवा देत ॥
हातालाही यश बहुत। हकीम विख्यात जाहले ॥ ४६ ॥

एकदा एका भक्ताचे डोळे। सुजूनि झाले लाल गोळे ॥
रक्तबंबाळ दोनी बुबळें। वैद्य न मिळे शिरडींत ॥ ४७ ॥

भक्त बिचारे भाविक भोळे । बाबांस दाखविते झाले डोळे ॥
बिबे ठेचूनि करविले गोळे । सत्वर ते वेळे बाबांनीं ॥ ४८ ॥
कोणी घालील सुरम्याच्या काडया।कोणी गाईच्या दुधाच्या घडया॥
कोणी शीतळ कापुराच्या वडया । देईल पुडया अंजनाच्या ॥४९॥
बाबांचा तो उपायचि वेगळा । स्वहस्तें उचलिला एकेक गोळा ॥
चिणूनि भरला एकेक डोळा । फडका बाटोळा वेष्टिला ॥ ५० ॥
उदयीक डोळ्याची पट्टी सोडिली । वरी पाण्याची धार धरिली॥
सूज होती ती सर्व निवळली । बुबुळें जाहलीं निर्मळ ॥५१॥
डोळया सारिखा नाजूक भाग । नाहीं बिब्याची झाली आग ॥
बिब्यानें दवडिला नेत्र रोग । ऐसे अनेग अनुभव ॥५२॥
धोती पोती तयां अवगत । नकळत एकांत स्थळीं जात ॥
स्नान करितां आंतडी ओकीत । धुऊन टाकीत वाळावया ॥ ५३ ॥
मशीदीहून जितका आंड । तितकेंच पुढें वडाचें झाड ॥
तयाहीपलीकडे एक आंड । दों दिवसा आड जात ते ॥५४॥
भर दुपारीं प्रखर ऊन । कोणी न तेथें ऐसें पाहून ॥
स्वयें आडांतून पाणी काढून । मुख मार्जन करीत ॥५५॥
असो ऐशिया एका प्रसंगीं । बैसले असतां स्नानालागीं ॥
आंतडी काढूनि लागवेगीं । धुऊं ते जागीं लागले ॥५६॥
अजा मारितां तिची आंतडी । बाह्याभ्यंतर करूनि उघडी ॥
धुऊनि घालिती घडीवर घडी । निर्मळ चोखडी करितात ॥५७॥
तैसीच आपुली आंतडी काढून । आंतून बाहेर स्वच्छ धुऊनि ॥
पसरलीं जांबाचे झाडावरूनी । आश्चर्य जनीं बहु केलें ॥ ५८ ॥

---

१ विहीर.

ज्यांहीं ही स्थिति डोळां देखिली । त्यांतील कांहीं हयात मंडळी ॥
आहेत अजून शिरडींत उरली । म्हणती वळी तो अपूर्व ॥ ५९॥
कधीं लावीत खंडयोग । करीत हस्तपादादि विलग ॥
ऐसे मशीदींत जागोजाग । अवयव अलग ते पडत ॥ ६० ॥
देह ऐसा खंड विखंड । देखावा तो भयंकर प्रचंड ॥
पाहूं धांवत लोक उदंड । बाबा अखंड त्यां दिसती ॥ ६१ ॥
पाहूनि एकदां ऐसा प्रकार । पहाणारा घाबरला फार ॥
कोणा दुष्टें बाबांस ठार । केलें अत्याचार हा ॥ ६२ ॥
मशीदींत ठिकठिकाणीं । अवयव दिसती चार ही कोनीं ॥
रात्र मध्यान्ह जवळीं न कोणी । चिंता मनीं उद्भवली ॥ ६३ ॥
जावें कोणास सांगावयाला । होईल उलट टांगावयाला ॥
ऐसा विचार पडला तयाला । जाऊनि बैसला बाहेर ॥ ६४ ॥
असेल साईचा हा योग कांहीं । हें तो तयाच्या स्वप्नींही नाहीं ॥
पाहोनि छिन्नभिन्नताही । भीती हृदयीं धडकली ॥ ६५ ॥
कोणास तरी कळवावा प्रकार । मनांत त्याचे येई फार ॥
परी मीच ठरेन गुन्हेगार । प्रथम खबर देणारा ॥ ६६ ॥
म्हणून कोणास सांगवेना । येत मनांत असंख्य कल्पना ॥
म्हणून पहाटे जाऊन पुन्हां । पहातां मना विस्मित ॥ ६७ ॥
अदृश्य पूर्वील सर्व प्रकार । बाबा कुशलस्थानीं स्थिर ॥
हें स्वप्न नाहींना ऐसा विचार । येऊनि पहाणार साश्चर्य ॥ ६८ ॥
हे योग हे धोतीपोती । बाळपणापासूनि आचरती ॥
कोणा न कळेती अगम्यगति । योगस्थिति तयांची ॥ ६९ ॥

दिडकीस नाहीं कोणाच्या शिवले । गुणानें प्रख्यातीतें पावले ॥
गरीव दुबळ्यांस आरोग्य दिधलें । हकीम गाजले ते प्रांतीं ॥ ७० ॥
हकीम हा तो केवळ परार्थी । अति उदास तो निजस्वार्थी ॥
साधावया परकीयार्थी । असह्यानर्थी साहतसे ॥ ७१ ॥
ये अर्थाची अभिनव कथा । निवेदितों मीं श्रोतियां करितां ॥
विदित होईल बाबांची व्यापकता । तैशीच दयार्द्रता तयांची ॥७२॥
सन एकोणीसशें दहा सालीं । समय धनतेरस दिवाळी ॥
बाबा सहज धुनीजवळी ॥ बैसले जाळीत लांकडे ॥ ७३ ॥
प्रखर तेवली होती धुनीं । निजहस्त त्यांतचि खुपसुनी ॥
बाबा बैसले निश्चित मनीं । हात भाजूनि निघाला ॥ ७४ ॥
माधव नामें तयांचा सेवक । लक्ष गेलें तयाचें साहजिक ॥
देशपांडेही होते नजीक । तेही तात्कालिक धांवले ॥ ७५ ॥
जाउनी मागें मारुनी बैसका । कंबरेस घट्ट घातला विळखा ॥
बाबांस मागें ओढोनि देखा । पुसती विलोका मग काय ॥७६ ॥
हाहा देवा हें काय केलें । म्हणतां बाबा ध्यानावर आले ॥
एक पोररे खाकेचें म्हणती निसटलें । भट्टींत पडलें एकाकी ॥७७
ऐकूनि निजपतीच्या हाके । लोहाराची रांडरे धाकें ॥
मारुनि आपुल्या पोरास खाके । भाता फुंकं भट्टीचा ॥७८॥
फुंकतां फुंकतां लक्ष चुकली । खांकेस पोर हें ती विसरली ॥
पोर ती अचपळ तेथून निसटली । पडतांच उचलली मी शामा ॥ ७९॥
काढावयास त्या पोरीला । गेलों तों हा प्रकार घडला ॥
भाजूं देरे हा हात मेला । प्राणरे वाचला पोरीचा ॥ ८० ॥

१ माधवराव देशपांडे

आतां या हाताचें दुखणें । कैसा उपाय करावा कवणें ॥
चांदोरकरास पत्र घालणें । माधवरावानें ठरविलें ॥ ८१ ॥

पत्र लिहिलें सविस्तर । परमानंद प्रसिद्ध डॉक्टर ॥
समवेत घेऊनिया सत्वर । आले चांदोरकर शिरडीस ॥ ८२ ॥

उपयोगा पडती दाहोपशमना । ऐशीं घेतलीं औषधें नाना ॥
परमानंद समवेत नाना । साई चरणा पातले ॥ ८३ ॥

करूनि बाबांस अभिवंदन । पुसती कुशल वर्तमान ॥
निवेदिलें आगमन प्रयोजन । हस्तावलोकन प्रार्थिलें ॥ ८४ ॥

आधींच हात पोळल्यापासून । भागोजी शिंदा तूप चोळून ॥
पट्या बांधीतसे करकरून । पान बांधून प्रत्यहीं ॥ ८५ ॥

तो हात सोडोनियां पहावा । परमानंदास दाखवावा ॥
दवा उपचार सुरू करावा । गूण पडावा बाबांना ॥ ८६ ॥

ही सदीच्छा धरूनि मनीं । बहुत नानानीं केली मनधरणीं ॥
प्रयत्नही केला परमानंदानीं । पट्या सोडूनी पहावें ॥ ८७ ॥

आज उद्यां आज उद्यां करुनी । वैद्य आपुला अल्ला म्हणूनी ॥
हस्त न दिधला पहावया लागुनी । खेदही न मनीं तयाचा ॥८८॥

परमानंदांचा आणिलेला दवा । तया न लागली शिरडीची हवा ॥
परी साईदर्शन सुहावा । तयां घडावा योग हा ॥ ८९ ॥

भागोजीचीच नित्य सेवा । भागोजीनेंच हात चोळावा ॥
तणें काळें हातही बरवा । होऊनि सर्वां सुख झालें ॥ ९० ॥

ऐसा जरी हात बरा झाला । न कळे बाबांस येई काय दुकळा ॥
ती प्रातःकाळची येतां वेळा । पट्यांचा सोहळा प्रतिदिनीं ॥ ९१ ॥

नसतां हातास कांहींही वेदना। नित्य निष्कारण तयाची जोपासना॥
घृतमर्दन निष्पीडन जोपासना । आमरणांत चालविली ॥ ९२॥
ही उपासना भागोजीची। साई सिद्धा न आवश्यकता जीची ॥
भागोजीस घडविती नित्यनेमाची । भक्तकाजाची आवडी ॥ ९३ ॥

पूर्व जन्मींचे महादोष । भागोजी पावला कुष्ट क्लेश ॥
परी तयाचें भाग्य विशेष । साई सहवास लाधला ॥ ९४ ॥
लेंडीवरी निघतां फेरी । भागोजी बाबांचा छत्रधारी ॥
रक्तपिती भरली शरीरीं । परी सेवेकरी प्रथम तो ॥ ९५ ॥
धुनीपासले स्तंभापाशीं । बाबा जेव्हां प्रातःसमयाशीं ॥
प्रत्यहीं बैसत निजारामाशीं । हाजर सेवेसीं तें भाग्या ॥ ९६ ॥
हातापायांच्या पट्या सोडणें। त्या त्या ठायीचे स्नायू मसळणें॥
मसळल्या ठायीं तूप चोळणें । सेवा करणें भाग्यानें ॥ ९७ ॥

पूर्व जन्मींचा महापापिष्ट । सर्वांगीं भरलें रक्त कुष्ट ॥
भागोजी शिंदा महाव्याधिष्ट । परी भक्त वरिष्ट बाबांचा ॥ ९८ ॥
रक्तपितीनें झडलीं बोटें । दुर्गंधीनें सर्वांग ओखटें ॥
ऐसें जयाचें दुर्भाग्य मोठें। भाग्य चोखटें सेवा सुखें ॥ ९९ ॥

---

१ सेवा करावयासाठीं कोणीही येवो. साई बाबांनी कोणाचा कधींही अव्हेर केला नाहीं. उलट त्यास प्रेमानेच वागविलें आहे. एकदां एक महारोगी बाई महाराजांकडे आली. महाराजांनीं भीमाबाई नांवाच्या एका मराठे जातीचे बाईला तिला आपल्या घरीं राहण्यास जागा देण्याविषयीं सांगितलं. भीमाबाई म्हणाली, " बाबा तिला महारोग झाला आहे ना ! तिला माझ्या घरांत जागा कशी देऊं ! " महाराज म्हणाले, " अगे ती महारोगी असली म्हणून काय झालें ! ती माझी बहीण आहे. सख्खी बहीण आहे. तिला आपल्या घरीं घेऊन जा. " असे महाराजांचे

किती म्हणुनी श्रोतयांला । वर्णू बाबांच्या अगाध लीला ॥
एकदां गावीं ग्रंथीज्वर आला । चमत्कार झाला तो परिसा ॥ १००

दादासाहेब खापर्ड्यांचा । मुलगा एक लहान वयाचा ॥
आनंद साईसहवासाचा । निज मातेच्या सहभोगी ॥ १०१ ॥

आधींच तो मुलगा लहान । ताप आला फणफणून ॥
मातेचें हृदय आलें उलून । अस्वस्थमन जाहली ॥ १०२ ॥

उमरावती वसतीस्थान । आलें मनीं करावें प्रस्थान ॥
सायंकाळची वेळ साधून । आली आज्ञापन घ्यावया ॥ १०३ ॥

अस्तमानची करितां फेरी । बाबा येतां वाडिया शेजारीं ॥
बाई जाउनी पाय धरी । निवेदन करी घडलें जें ॥ १०४ ॥

आधींच स्त्रियांची जात घाबरी । तशांत मुलाची थांबेना शिरशिरी॥
ग्रंथि ज्वराची भीतीही भारी । निवेदन करी घडलें तें ॥१०५॥

---

शब्द निघाल्यावर भीमाबाई तिला आपल्या घरीं घेऊन गेली व तिनें तिला उतरावयाला जागा दिली. ती महारोगी बाई एक महिना राहून तिनें तेथेंच आपला देह ठेविला.

बाळाजी पाटील नेवासकर हे एकदां आपल्या गांवीं जाण्यासाठीं परवानगी मागूं लागले. महाराज म्हणाले "तो दगडूभाऊ आजारी आहे त्याच्याकडे आपण लक्ष द्यावें." दगडूभाऊ हा जातीचा मुसलमान रक्तपितीनें अत्यंत पीडला होता. पाटलांनीं रोज त्याच्या आंगांतले किडे काढावे, सगळी लस स्वतः धुवावी, आणि त्याला स्नान घालावें असा क्रम एक महिना चालला. पुढें तो दगडूभाऊ मला आणि पाटलाला महाराजांनीं घरीं जाण्याची परवानगी दिली.

२ दि ऑनरेबल गणेश श्रीकृष्ण खापर्डे जे हल्लीं इंडिया सरकारचे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे मेंबर आहेत.

बाबा वदती मृदु वचन । आभाळ आलें आहे जाण ॥
पडेल पाऊस पीकपिकोन । आभाळ वितळून जाईल ॥ १०६ ॥

भितां किमर्थ ऐसें वदून । कफनी कंबरेपर्यंत उचलून ॥
दाविते झाले सकळां लागून । ग्रंथी टवटवून उठलेल्या ॥ १०७ ॥

कुक्कुटीच्या अंड्यांएवढें । चार ग्रंथी चोहींकडे ॥
म्हणती पहा हें भोगणें पडे । तुमचें सांकडें मजलागीं ॥ १०८ ॥

हें दिव्य आणि अलौकिक । कर्म पाहोनि विस्मित लोक ॥
भक्तांलागीं दुःखेंही कैक । भोगिती अनेक संत कशीं ॥ १०९ ॥

मेणाहूनि मऊचित्त । सबाह्य जैसें नवनीत ॥
लाभेवीण भक्तांसी प्रीत । भक्तचि गणगोत जयाचें ॥ ११० ॥

एकदां ऐसा वर्तला प्रकार । नानासाहेब चांदोरकर ॥
निघाले सोडूनि नंदुरबार । पंढरपुरास जावया ॥ १११ ॥

नाना परम भाग्यशाली । साईची अनन्य सेवा फळली ॥
भूवैकुंठ प्राप्ती घडली । मामलत मिळाली तेथील ॥ ११२ ॥

येतांच हुकूम नंदुरबारीं । जाणें होतें अति सत्वरीं ॥
तातडीनें केली तयारी । हेत अंतरीं दर्शनाचा ॥ ११३ ॥

सहकुटुंब सहपरिवार । शिरडीस जाण्याचा झाला विचार ॥
शिरडीच प्रथम पंढरपूर । करूं नमस्कार बाबांसी ॥ ११४ ॥

नाहीं कोणास पत्र पाठविलें । नाहीं निरोप वृत्त कळविलें ॥
सरसामान सर्व आवरिलें । गाडींत बैसले लगबगा ॥ ११५ ॥

ऐसे जे हे नाना निघाले । नसेल शिरडींत कोणास कळलें ॥
परी साईस सर्व समजलें । सर्वत्र डोळे तयांचे ॥ ११६ ॥

नाना निघाले सत्वर । असतील निमगावाचे शिवेवर ॥
तों शिरडींत चमत्कार । घडला साचार तो परिसा ॥ ११७ ॥

बाबा होते मशींदींत । म्हाळसापती समवेत ॥
आपाशिंदे काशीराम भक्त । वार्ता करीत बसलेले ॥ ११८ ॥

इतुक्यांत बाबा म्हणती अवघे । मिळून करूंया भजन चांगे ॥
उघडिले पंढरीचे दरवाजे । भजन मौजेनें चालवूं ॥ ११९ ॥

साई पूर्ण त्रिकालज्ञाता । कळून चुकलं तयां ही वार्ता ॥
नाना शिवेच्या ओढयासीं असतां । भजनोल्लासता बाबांस ॥१२०॥

## ॥ भजन ॥

"पंढरपुरला जायाचें जायाचें । तिथेंच मजला राह्याचें ॥
तिथेंच मजला राह्याचें राह्याचें । घर तें माझ्या रायाचें ॥"

स्वयें बाबा भजन म्हणती । भक्त बसलेले अनुवाद करिती ॥
पंढरीचें प्रेमांत रंगती । इतक्यांत येती नानाही ॥ १२१ ॥

सहकुटुंब पायीं लागत । म्हणतो आतां आम्हां समवेत ॥
महाराजांनीं पंढरपुरांत । निवांस निश्चित बसावें ॥ १२२ ॥

तों ही विनंती नकोच होती । आधींच बाबांची उल्हास वृत्ती ॥
पंढरी गमन भजन स्थिती । जन निवेदिती तयांस ॥ १२३ ॥

नाना मनीं अति विस्मित । लीला पाहूनी आश्चर्य चकित ॥
तया पायीं डोई ठेवित । सद्गदीत जाहले ॥ १२४ ॥

घेऊनिया आशिर्वचन । उदी प्रसाद मस्तकीं वंदून ॥
चांदोरकर पंढरपुरा लागून । निरोप घेऊन निघाले ॥ १२५ ॥

ऐशा गोष्टी सांगूं जातां । होईल ग्रंथ विस्तारता ॥
म्हणऊनी आतां परदुःख निवृत्तिता । विषय आटोपता घेऊं हा॥१२६॥

संपवूं हा अध्याय आतां । अंत नाहीं बाबांचे चरिता ॥
पुढील अध्यायीं अवांतर कथा । वदीन स्वहितालागीं मी ॥१२७॥

ही मीपणाची अहंवृत्ति । जिरवूं जातां जिरेना चित्तीं ॥
हा मी कोण न कळे निश्चितीं । साईच वदतील निज कथा ॥१२८॥

वदतील नर जन्माचि महती । कथितील निजभक्ष्य वृत्ति ॥
बायजाबाईची ती भक्ति । भोजन स्थिति ही अपुलि ॥ १२९ ॥

सर्वे घेऊनि म्हाळसापती । तैसेच कोते तात्या गणपती ॥
बाबा निजत मशीदीप्रती । कैसिये रीती तें परिसा ॥ १३० ॥

पंत हेमाड साईस शरण । म्हणवी भक्त-पायींची वहाण ॥
तयास साईची आज्ञा प्रमाण । झालें निरूपण येथवर ॥ १३१ ॥

इति श्रीसंतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । विविधकथा निरूपणं नाम
सप्तमोऽध्यायः संपूर्णः

श्रीसाईनाथार्पणमस्तु शुभंभवतु.

# अध्याय ८ वा.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
॥ श्रीसद्गुरुसाईनाथायनमः ॥

मागील अध्यायीं जाहले कथन । कैसें साई हिंदू वा यवन ॥
काय त्या शिरडीचें भाग्य गहन । जें निज स्थान बाबांचें ॥१॥
कैसे बाबा आरंभी पोर । पुढें जाहले वेडे फकीर ॥
कैसी बनविली बाग सुंदर । मूळच्या उखर स्थळाची ॥ २ ॥
कैसा काळें करून पुढा । त्याच जागेवर जाहला वाडा ॥
धोती पोती खंडयोग गाढा । वर्णिला निधडा बाबांचा ॥३॥
झिजवूनियां निजकाय । बाबांनीं साहिलें कैसे अपाय ॥
भक्त कैवारी साईराय । वर्णूं मी काय तयातें ॥४॥
आतां ऐका नरजन्माचें महिमान । साईच्या भिक्ष्यवृत्तीचें वर्णन ॥
बायजाबाईचें संतसेवन । बाबांचें भोजन कौतुक ॥५॥
तात्या बाबा म्हाळसापती । तिघे कैसे मशिदी निजती ॥
कैसे खुशालचंदाचें गृहा जाती । राहत्याप्रती समर्थ ॥ ६ ॥
प्रत्यहीं उदय प्रत्यहीं अस्त । वर्षानवर्षे जाहलीं फस्त ॥
अर्धाजन्म निद्रितावस्थ । उरला ही स्वस्थ भोगवेना ॥ ७ ॥

बाळपणीं क्रीडासक्त । तरुणपणीं तरुणीरक्त ॥
वृद्धापकाळीं जराग्रस्त । सदैव त्रस्त आधींनीं ॥ ८ ॥
जन्मास येऊनी पुष्ट होणें । श्वासोच्छ्वास करीत राहणें ॥
दीर्घायुष्य वरी वाचणें । हें काय केणें या जन्मीं ॥ ९ ॥
परमात्मप्राप्ति हेचि साची । इतिकर्तव्यता नरजन्माची ॥
ना तरी श्वान सूकरादिकांची । जीविकाची काय उणी ॥ १० ॥
श्वानेंही आपुलीं पोटें भरती । प्रजोत्पादन यथेष्ट करिती ॥
तेथें नरदेहाचीच काय महती । साम्य स्थिति उभयतां जैं ॥११॥
पिंडपोषण आणि मैथुन । हेंच जरी नरदेहाचें साधन ॥
हेंच जरी या जन्मांचें पर्यवसान । तरी तो नरजन्म निरर्थ ॥१२॥
आहार निद्रादि चतुष्टय । यांतचि होतां आयुष्य क्षय ॥
मग श्वानां मानवां भेद काय । करा निर्णय विवेकें ॥ १३ ॥
हीच जरी नरदेहसफलता । तरू जन्मीं काय न्यूनता ॥
भस्त्राही करी श्वासोच्छ्वासता । शरीर पुष्टतां श्वानांही ॥ १४ ॥
मनुष्य प्राणी मुक्त आहे ॥ तो निर्भय तो स्वतंत्र पाहे ॥
तो शाश्वत ही जाणीव राहे । सफलता हे जन्माची ॥ १५ ॥
आला कोठूनी आहे कोण । नरजन्माचें काय कारण ॥
एथील बीज जाणे तो प्रवीण । त्यावीण शीण मग सारा ॥१६॥
जैसी नंदादीपाची ज्योती । एकचि दिसे आदि अंतीं ॥
परी वेगळी क्षणाक्षणापति ॥ तैशीच स्थिति देहाची ॥ १७ ॥
बाल्य तारुण्य वार्धक्यावस्था ॥ या तों प्रकट जनां समस्तां ॥
परी जाती येती जाती स्वभावतः ॥ काणा न कळतां कदांही ॥१८॥

१ स्वभाविकपणें

दिसे तीच तत्क्षणीं नासे । अपरिमित तरी एकचि भासे ॥
तैसाचि देह जो या क्षणीं असें । क्षणांतीं नसे पूर्वील ॥ १९ ॥

देह मळमूत्राची न्हाणी । श्लेष्म पूयलाळीची घाणी ॥
मरण ठेविलें क्षणोक्षणीं । कुलक्षणी मोठा हा ॥ २० ॥
जें हें कृमीकीटकांचें घर । नाना रोगांचें आगर ॥
अश्वत्थ आणि क्षणभंगुर । तें हें शरीर मानवी ॥ २१ ॥
मांस शोणित स्नायूचा गाडा । तो हा अस्थि चर्मांचा सांगाडा ॥
मूत्र पुरीष दुर्गंधीचा राडा । जीवाचा खोडा प्रत्यक्ष ॥ २२ ॥
त्वचा मांस रुधिर स्नायू । मेद मज्जा अस्थिवायू ॥
अमंगल अंगें उपस्थ पायू । ते अल्पायू हे काया ॥ २३ ॥
ऐसा अमंगल आणि नश्वर । नरदेह जरी क्षणभंगूर ॥
तरी मंगल धाम श्रीपरमेश्वर । हातीं येणार एणेंच ॥ २४ ॥
सदैव लागलें जन्म मरण । कल्पनेचेंच भय दारुण ॥
नाहीं लागतां कानाला कान । प्राण हा निघून जाईल ॥ २५ ॥
कोण लक्षी दिवसरातीं । किती येती आणिक जाती ॥
मार्कंडेयाच्या आयुष्यें जन्मती । तयांही कालगति चुकेना ॥२६॥
ऐशिया क्षणभंगुर नरदेहीं । पुण्यश्लोक कथावार्ताहीं ॥
गेलेला काळचि पडेल संग्रहीं । तद्विरहित तो व्यर्थ ॥ २७ ॥
हीच जाणीव झालिया निश्चित । हेंचि जन्मा आल्याचें हित ॥
परी हा विश्वास नाहीं पटत । अनुभवाव्यतिरिक्त कोणाही ॥२८॥
परी यावया हा अनुभव । करूं लागे अभ्यास विभव ॥
तरी शाश्वत सुखार्थी हा जीव । तेणे हें वैभव साधावें ॥ २९ ॥

१ क्षणभंगुर, उद्या नाहीं तो.

दारा सुत वैभव वित्त । पृथ्वी समुद्रवलयांकित ॥
ईश्वरकृपें इतुकेंही प्राप्त । तरी तो अतृप्त मानसीं ॥ ३० ॥
शाश्वत सुख आणि शांति । हेंच ध्येय ठेवूनि चित्तीं ॥
भूतीं भगवंत हे एक उपास्ति । परम प्राप्तिदायक ॥ ३१ ॥
त्वचा मांस रुधिर हाडां । जोडूनि केला हा देहसांगाडा ॥
परमार्थाचा प्रत्यक्ष खोडा । ममत्व सोडा तयाचें ॥ ३२ ॥
मानावा तो केवळ चाकर । नका बसवूं त्या डोक्यावर ॥
लाड न पुरवा निरंतर । नरकद्वार करूं नका ॥ ३३ ॥
निर्वाहा पुरें अन्न आच्छादन ॥ तैसेंच तात्पुरतें लालन पालन ॥
लावा अध्यात्मिक उन्नति लागून । जन्ममरण चुकवावया ॥३४॥
जन्ममरणादि अनर्थात्मक । प्रतिक्षण विनाशोन्मुख ॥
कैसें क्षणिक याचें सुख । निरंतर असुख जो ॥ ३५ ॥
जैशी विद्युलता पाहीं । आतां आहे आतां नाहीं ॥
क्षणिक सागर तरंगताही । विचार कांहीं करावा ॥ ३६ ॥
देहगेहापत्य स्त्री जन । हीं सर्व नाशिवंत जाणून ॥
माता पित्यांसीं खांदा वाहून । स्वयें जो उमजेन आपण ॥३७॥
मेल्या मागें खुशाल मरे । फिरे जन्ममरणाचे फेरे ॥
परी तें कोण्या गुणें आवरे । विचार न करी क्षणभरी ॥ ३८ ॥
करितां नित्य कुटुंबाची भर । आयुष्य जातसे भराभर ॥
काळ आयुष्य गणना तत्पर । कर्तव्य विसर त्या नाहीं ॥ ३९ ॥
भरतां अखेरची घडी । मगतो थांबेना एकचिपडी ॥
धीवर जैसा जाळें ओढी । मरणीं तडफडी जीव तैसा ॥ ४० ॥
महद्भाग्याचिया परवडी । वेंचूनिया पुण्य कोटी ॥
लाधली नरदेहाची जोडी । घडीनें घडी साधावी ॥ ४१ ॥

करूं जातां भगीरथ युक्ति । या नरदेहाची नाहीं प्राप्ति ॥
केवळ अदृष्टें ये अवचट हातीं । व्यर्थचि मातींत मिळवा ना ॥४२॥
पुढील जन्मीं करूं म्हणतां । एकदां हा हातींचा जातां ॥
पुढें हाच येईल ही निश्चितता । ऐसें मानिता तो मूर्ख ॥ ४३ ॥
किति एक पापी देहवंत । होऊनि शुक्रबीज समन्वित ॥
योनिद्वारास होती प्राप्त । शरीर ग्रहणार्थ निजकर्में ॥ ४४ ॥
कितीएक ते त्याहून अधम । असतां जंगमवर्गीं जन्म ॥
मागुती स्थावर भावपरम । यथाकर्म प्राप्त त्यां ॥ ४५ ॥
जेणें जैसें उपार्जिलें ज्ञान । जयाचें जैसें कर्मानुष्ठान ॥
तदनुसार तया शरीर ग्रहण । श्रुतिप्रमाण हा योग ॥ ४६ ॥
' यथाप्रज्ञं हिसंभवा ' । वदे श्रुति माय अतिकणवा ॥
जैसा जयाचा विज्ञान ठेवा । जननही जीवा तैसेंच ॥ ४७ ॥
अतर्क्य ईश्वरी विंदान । अशक्य तयाचें संपूर्ण ज्ञान ॥
अंशमात्रें लाधे जरी कवण । एक तो धन्य नरदेह ॥ ४८ ॥
परमभाग्यें हा नरजन्म । महत्पुण्यें ब्राह्मणवर्ण ॥
ईशकृपें साईचे चरण । लाभ हा संपूर्ण अलभ्य ॥ ४९ ॥
आहेत जरी नाना योनी । मानवचि श्रेष्ठ सर्वांहुनी ॥
आलों कोठुनी निर्मीलें कोणी । विवेक श्रेणी मानवीच ॥५०॥
इतर योनी हें न जाणती । उपजती तैशा नाश पावती ॥
भूतभावीवर्तमानगति । ईश्वरस्थिति नेणती ॥ ५१ ॥
म्हणोनि हा नरदेह निर्मून । ईश्वर झाला आनंद संपन्न ॥
कीं विवेक वैराग्यातें वरून । नर मद्भजन करील ॥ ५२ ॥
विनाशी नर करितां साधन । होईल अविनाशी नारायण ॥
नरदेहासम साधनसंपन्न । दुजा न आनये सृष्टीं ॥ ५३ ॥

गारुडी स्वयें मोठा चतुर । खेळ न करी अज्ञानिया समोर ॥
जाणे कुशलतेचें वर्मसार । तो प्रेक्षक संभार अपेक्षी ॥ ५४ ॥
तैसाच पशुपक्षी वृक्षसंभार । जीव जंतु निर्मून अपार ॥
सखेदाश्चर्य परमेश्वर । लीला निःसार गमली त्या ॥ ५५ ॥
अफाट हा ब्रम्हांड विस्तार । चंद्रसूर्य तारा भार ॥
निर्मित्याच्या कौतुकाचा विचार । लव भार कोणीही करीना ॥५६॥
हा सर्व खेळ करण्या आंतू । माझा जगदीशाचा काय हेतू ॥
ये अर्थांचा निश्चयमातू । एकही जंतू जाणेना ॥ ५७ ॥
माझी अतुल वैभव संमृद्धि । जाणील ऐसा कुशाग्रबुद्धी ॥
प्राणी निर्मिला नाहींतदवधि । विफल त्रिशुद्धि मम कार्य ॥ ५८ ॥
ऐसें जाणून जगदीशें । निर्मिला प्राणी मानववेशें ॥
कीं जो सारासार बुद्धिवशें । मज सामर्थ्यें जाणील ॥ ५९ ॥
अगाध माझें वैभव । तैशीच माझी शक्ति अपूर्व ॥
माझ्या मायेचा हा खेळ सर्व । आश्चर्यपूर्वक तो जाणे ॥ ६० ॥
तोच करील ज्ञान संपादन । मच्चिंतन आणि मदवलोकन ॥
तोच होईल आश्चर्य संपन्न । होईल तें पूर्ण खेळ माझा ॥ ६१ ॥
प्रेक्षकाची जी आनंद संपन्नता । तीच मज माझे खेळाची सांगता ॥
पाहूनि माझी जगन्नियंतृता । नर कृतार्थता मानील ॥ ६२ ॥
काम्यकर्में द्रव्योपार्जन । एतदर्थ न शरीर पोषण ॥
यावज्जीव तत्वज्ञान संपादन । हेंच जीवन साफल्य ॥ ६३ ॥
तत्व तेंच जें अभेदज्ञान । तेंच उपनिषद्ब्रम्हज्ञान ॥
तेंच परमात्मोपासन । तेंच तो भगवान भक्तांचा ॥ ६४ ॥

१ समग्रपणें.

गुरु ब्रम्ह नव्हेत दोन । झालें जया हें अभेद ज्ञान ॥
हीच भक्ती घडतां जाण । माया तरण सुगम जें ॥ ६५ ॥
जे श्रद्धावंत पुरुषयोग्य । संपादिती ज्ञान वैराग्य ॥
हें आत्मतत्त्वचि निजभोग्य । भक्त सभाग्य ते जाणा ॥ ६६ ॥
स्वस्वरूपाचें जें अभान । तें अज्ञान निरसल्यावीण ॥
स्वयें कृतार्थ मानी जो आपण । प्रतिबंध विलक्षण हा एक ॥६७॥
ज्ञान आणि अज्ञान । दोनी हे विकार अविद्याजन्य ॥
कांटियानें कांटा फेडून । तैसीं उडवून द्या दोनी ॥६८॥
ज्ञानानें दूर करा अज्ञान । ज्ञानाज्ञानातीत होऊन ॥
निर्मळ स्वस्वरूपावस्थान । हें एक पर्यवसान नरजन्मा ॥६९॥
न करितां स्नेहाची रांगोळी । अज्ञान तमाची कोजळी ॥[२]
मी मम या वातीची होळीं ।[१] ज्ञान न पाजळी निजप्रभा ॥७०॥
नरदेहगत जें जें कार्य । असो निवार्य वा अनिवार्य ॥
हें तो सर्व बुद्धिकर्तव्य । निश्चयप्राय जाणावें ॥ ७१ ॥
नाहीं आपणा दुजें काम । स्वस्थ भोगावें ऐश्वर्य आराम ॥
अथवा चिंतावें रामनाम । होऊं निष्काम निश्चित ॥ ७२ ॥
शरीरेंद्रिय मन बुद्धि । या तो सर्व आत्म्याच्या उपाधि ॥
हींच आत्मा भोक्तृत्व आपादी । स्वयें अनादि अभोक्ता ॥७३॥
आत्म्याचें भोक्तृत्व औपाधिक । स्वयें अभोक्ता स्वाभाविक ॥
शास्त्र न्याय अन्वय व्यतिरेक । प्रमाण देखा ये अर्थी ॥ ७४ ॥
हें एक जाणोनि निजवर्म । बुद्धीस सोंपावें प्राप्तकर्म ॥
तिचे हातीं मनाचे धर्म । स्वयें निष्कर्म वर्तावें ॥ ७५ ॥

---

१ तेल. २ वात जळाल्या नंतर राख स्वरूप राहते ती.

स्वधर्माचें अनुष्ठान । सदैव आत्मानात्मचिंतन ॥
हेंच नरजन्माचें पर्यवसान । समाधान स्वरूपीं ॥ ७६ ॥
नाहीं नरदेहापरी आन । चारीं पुरुषार्थ साधाया साधन ॥
जो नर अभ्यास परायण । तो नारायण पद पावे ॥ ७७ ॥
म्हणून झालें न जों शरीरपतन । आत्मज्ञानार्थ करा यत्न ॥
नर जन्माचा एकही क्षण । उपेक्षून टाकूं नका ॥ ७८ ॥
समुद्रीचें क्षारोदक । मेघाहातीं पडतां देख ॥
होतें जैसें गोड पीयूष । तें सुख जडतां गुरुपायीं ॥ ७९ ॥
ऐशिया नरदेहाची सद्गती । गुरुविना नकळे कवण्याप्रति ॥
गुरूच जेव्हां धरतील हातीं । तेंच उद्धरतील जड जीव ॥ ८० ॥
मंत्र तीर्थ देव द्विज । ज्योतिर्वेद आणि भेषज ॥
तैसेच सातवे गुरुराज । भाव ना काज या अवघियां ॥ ८१ ॥
ययांच्या ठायीं जैशी भावना । सिद्धीही तैशीच त्याप्रमाणा ॥
वेग जैसा आधिक उणा । सिद्धीही जाणा तैशीच ॥ ८२ ॥
बद्धास करिती मुमुक्षूसंत । मुमुक्षूचा करिती मुक्त ॥
अव्यक्ताचे होऊन व्यक्त । परोपकारार्थ हें करिती ॥ ८३ ॥
कार्य नव्हे जें व्याख्यानें पुराणें । सुकर होई तें सत्पुरुषा चरणें ।
तयाचें हालणें बोलणें चालणें । उपदेशणें निःशब्द ॥ ८४ ॥
क्षमा शांति निःसंगता । भूतदया परोपकारता ।
इंद्रियनिग्रह निरहंकारता । यांचा आचरता दुर्लभ ॥ ८५ ॥
जें न लाभे पढतां ग्रंथ । सुलभतें पहातां एक क्रियावंत ॥
करी जें न तारागण अनंत । संपादी भास्वत एकला ॥ ८६ ॥
तैसेच हे उदार संत । सहज क्रिया त्यांच्या अनंत ।
करिती जीवांस बंधमुक्त । सौख्य अत्यंत देनात ॥ ८७ ॥

यांतीलचि एक साईमहंत । ऐश्वर्यवंत श्रीमंत ॥
परी फकीरासम आचरित । आत्मनिरत सर्वदा ॥ ८८ ॥
अनवच्छिन्न जयाची समता । मी माझें ही नाहीं वार्ता ॥
जीवमात्रीं सदा सदयता । भूतीं भगवंतता मूर्तिमंत ॥ ८९ ॥
सौख्यें जयासीं नाहीं हरिख । दुःखें जयासीं नाहीं शोक ॥
सरिसे जया रावरंक । हें काय कौतुक सामान्य ॥ ९० ॥
जयाची भ्रूविक्षेपलहरी । क्षणांत रंकाचा राव करी ॥
तो हा घेऊनि चौपालवी करीं । दारोदारीं हिंडतसे ॥ ९१ ॥
धन्य ते जन जयांचे द्वारीं । बाबा होऊनि भिक्षेकरी ॥
पोरी आणगे चतकुर भाकरी । म्हणूनि पसरी निजकर ॥ ९२ ॥
घेई टमरेल एके करीं । दुजिया हातीं चौपदरी ॥
स्वयें फिरे दारोदारीं । नियमित घरीं प्रतिदिनीं ॥ ९३ ॥
भाजी सांबारें दूध ताक । पदार्थ तितुके सकळिक ॥
टमरेलांत ओतिती लोक । पहा हें कवतीक खाण्याचें ॥ ९४ ॥
शिजला भात अथवा भाकरी । घ्यावया पसरली चौपदरी ॥
पातळ पदार्थ मग कँसीहीपरी । टमरेला भितरीं रिचविती ॥९५॥
पदार्था पदार्थाची चवी घ्यावया लालसा कोठून व्हावी ॥
रसासक्ति जिव्हे न ठावी । जीवीं उठावी कँसेंनी ॥ ९६ ॥
झोळींत पडलें जें यदृच्छेनें । तृप्त असावें तयाच्याच सेवनें ॥
रुचकर कीं बेचव हें नेणें । चवीच रसनें नाहीं कीं ॥ ९७ ॥
प्रहर दिवसा वस्ती लागुनी । भिक्षा मागत प्रतिदिनीं ॥
तेणें उदर पूर्ति करुनी । समाधानी वर्तत ॥ ९८ ॥
भिक्षातरी काय नियमित । इच्छेस येइल तेव्हां मागत ॥
कधीं बारा वेळ एका दिवसांत । भिक्षेस जात गांवांत ॥९९॥

एर्णोपरी जें अन्न आणीत । मशीदींतील कुंडीत ठेवीत ॥
कावळे कुत्रें त्यांतचि खात । कधीं न हांकीत तयांना ॥१००॥
मशीद आंगण झाडणारी । त्यांतून दहाबारा भाकरी ॥
घेऊन जाई आपुले घरीं । कोणी न वारी तिजलागी ॥१०१॥
कुत्र्यां मांजरा हडहड करणें । स्वप्नांतही जो कदां नेणें ॥
तो काय गरीब दुबळ्या नको ह्मणे । धन्य जीणें तयांचें ॥१०२॥
आरंभीं हा वेडा फकीर । येच नामें जनां महाशूर ॥
तुकडे मागूनी भरी जो उदर । कैंचा बडिवार तयाचा ॥१०३॥
फकीर परी हाताचा सढळ । निरपेक्ष आणि स्नेहाळ ॥
बाह्य चंचल अंतरीं अचळ । कळा अकळ तयाची ॥ १०४ ॥
ऐसीयाही त्या कुग्रामांत । जात्या अतीव दयावंत ॥
होतें कांहीं भाग्यवंत । ते त्या महंत मानीत ॥१०५॥
तात्या कोते यांची आई । नांव जियेचें बायजाबाई ॥
पाटीत भाकऱ्या घेऊनि डोयी । रानांत जाई दुपारा ॥ १०६ ॥
कोस कोस रान धुंडावें । दाट झाड झुडूप तुडवावें ॥
वेड्या फकीरास या हुडकावें । पाया पडावें तयाच्या ॥१०७॥
काय तिच्या त्या सत्वाची थोरी । ओली कोरडी भाजी भाकरी ॥
रानींवनीं दुपारीं तिपारीं । भरवी न्याहारीं बावांतें ॥ १०८ ॥
ऐसें तिचें तपाचरण । बाबाही न विसरले आमरण ॥
केलें तिच्या पुत्राचें कल्याण । पूर्ण स्मरणपूर्वक ॥ १०९ ॥
उभयतां त्यां स्त्री पुरुषांचा । फकिरापायीं दृढभाव साचा ॥
फकीरचि देव त्या उभयतांचा । भावार्थियाचाच देव कीं ॥११०॥
फकीरानें ध्यानस्थ असावें । बायजाबाईनें पान मांडावें ॥
पाटींतील अन्न वाढावें । खाववावें प्रयत्नें ॥१११॥

फकीरी अव्वल बादशाही । फकिरीही चिरंतन राही ॥
अमिरी क्षणभंगुर पाही । सदां बाबांहीं म्हणावें ॥ ११२ ॥
पुढें बाबांनीं रान त्यागिलें । गांवांत येऊन राहूं लागलें ॥
मशीदींत अन्न खाऊं आदरिलें । कष्ट चुकविले आईचे ॥११३॥
ऐसा हा नेम तेव्हांपासुनी । जैसा चालविला त्या उभयतांनीं ॥
तैसाच तो तयांचे मागुनी । तात्यांनींही चालविला ॥ ११४ ॥
धन्यधन्य ते संत सदैव । ज्याचे हृदयीं वासुदेव ॥
धन्य तया भक्तांचे सुदैव । समागम वैभव ज्यां त्यांचें ॥११५॥
तात्या महा भाग्यवान । म्हाळसापतीचेंही पुण्य गहन ॥
बाबांचे समागमाचा मान । संमसमान भोगीत ॥ ११६ ॥
तात्या आणि म्हाळसापती । मशीदींतच शयन करिती ॥
बाबांचीही अनुपम प्रीती । दोघांवरतीं सारखी ॥ ११७ ॥
पूर्वपश्चिमे उत्तरेस । डोया तिघांच्या तीन दिशेस ॥
पाय परस्परांचे पायांस । मध्य बिंदूस भिडविती ॥ ११८ ॥
ताणूनि ऐशिया पथाऱ्या । गोष्टी वार्ता चालती साऱ्या ॥
एकास येतां निद्रेच्या लकेऱ्या । तयास दुसऱ्यानें जागवावें ॥११९॥
तात्या घोरूं लागतां । उठावें बाबांनीं अवचितां ॥
करोनी तयास उलथापालथा । दाबावा माथा तयाचा ॥ १२० ॥
घेउनि समवेत म्हाळसापती । विलगती दोघे तात्याप्रति ॥
आवळून धरिती पाय दाविती । पाठही रगडिती तयाची ॥१२१॥
ऐशीं सबंध चवदा सालें । बाबासवें तात्या मशिदींत निजले ॥
काय भाग्याचे ते दिवस गेले । स्मरणीं राहिले अखंड ॥१२२॥
घरीं ठेवूनियां मायबापें । बाबांच्या आवडी मशीदीं झोंपे ॥
प्रेम तें मापात्रें कवण्या मापें । मोल या कृपेचें कोण करी ॥१२३॥

पुढें वडील पंचत्व पावले । तात्या घर संसारांत पडले ॥
झाले घरधनी स्वयें दादुले । निजूं लागले निजगृहीं ॥ १२४ ॥
असो ऐसा निष्ठावंत भाव । तयासींच साईचा अनुभव ॥
अनाहूत उभा स्वयमेव । भक्त नवलाव पाहूं ये ॥ १२५ ॥
तैसेच राहत्यांत एक गृहस्थ । खुशालचंद नामें विख्यात ॥
होते बाबांचे भक्त धनवंत । नगरशेट गांवींचे ॥ १२६ ॥
प्रसिद्ध पाटील गणपत कोते । जैसे बाबांचे फार आवडते ॥
चुलते खुशालचंदाचे होते । तैसेंच बाबांतें प्रिय बहू ॥ १२७ ॥
जरी जातीचे मारवाडी । बाबालागीं मोठी आवडी ॥
परस्परांच्या घटोघडी । भेटी सुखपरवडी ते घेत ॥ १२८ ॥
हरीच्छेनें कांहीं काळें । वडील शेटजी पंचत्व पावले ॥
तरीही न बाबा विसरले । प्रेम पहिलें दुणावलें ॥ १२९ ॥
पुढेंही खुशालचंदावरतीं । वाढत गेली बाबांची प्रीति ॥
आदेहांत दिवसराती । कल्याणा जागती तयाचे ॥ १३० ॥
कधीं गोरथीं किंवा हयरथीं । सवें घेऊनी प्रेमाचे सांगाती ॥
तेथून दीड मैलावरती । रहात्याप्रति जात बाबा ॥ १३१ ॥
ग्रामस्थ लोक सामोरे येत । ताशे वाजंत्री सवें घेत ॥
बाबांस गांवांचे वेशीवर भेटत । लोटांगणीं येत प्रेमानें ॥ १३२ ॥
मग तेथून गांवा आंत । बाबांस समारंभें नेत ॥
अति प्रेमें वाजत गाजत । आनंद भरित मानसें ॥ १३३ ॥
खुशालचंद आपुलें सदनीं । बाबांस मग जात घेउनी ॥
तेथें अल्पाहार करवुनी । सुखासनीं बैसवीत ॥ १३४ ॥
मग त्या जुन्या पुराण्या वार्ता । आठवूनि कथिती उभयतां ॥
परस्परांच्या आनंदचित्ता । कोणास वर्णितां येईल तो ॥ १३५ ॥

एणें प्रमाणें आनंद विहार। पूर्ण होतां फळाहार॥
बाबां मग स्वानंद* निर्भर। सह परिवार परतती॥ १३६॥

एकीकडे हें रहातें गांव। दुसरीकडे तें निमगांव॥
या दोहोंच्या मध्यें ठाव। शिरडी गांव वस्तीचा॥ १३७॥

जरी या मध्यबिंदू पासून। या दोन गांवाबाहेर प्रयाण॥
स्थूल देहें केलें न आनिर्वाण। तरी तयां जाण सर्वत्र॥१३८॥

नाहीं इतर कोठें प्रयाण। नाहीं अग्निरथाचें दर्शन॥
तरी त्या रथाचें गमनागमन। वेळ प्रमाण त्यां ठावें॥ १३९॥

साधावया गाडीची वेळ। भक्तांनीं करावी तयारी प्रबळ॥
आज्ञा मागूं जातां जवळ। म्हणावें उतावीळ कां झाळां॥ १४०॥

बाबा न करितां आतां ज्ञातडी। चुकेल माझी मुंबईची गाडी॥
नोकरीवर येईल धाडी। साहेब काढील मजला कीं॥ १४१॥

---

*यासंबंधी रा.रा. हरी सिताराम दिक्षित यांस आलेला एक अनुभव:- " एके दिवशी दोन प्रहरीं मला महाराज म्हणाले " खुशालभाऊ पुष्कळ दिवसांत आले नाहींत. तूं टांगा घेऊन राहत्यास जा व त्यांना घेऊन ये. त्यांना म्हणावें तुम्हांला बाबांनीं बोलाविलें आहे. " त्या प्रमाणें मी टांगा घेऊन राहत्यास गेलों. खुशालभाऊंची भेट झाली. ते म्हणाले "मी दुपारीं जेऊन निजलों होतों. माझा डोळा लागला तोंच महाराज स्वप्नांत आले व मला म्हणाले "शिर्डीस चल" त्याप्रमाणें मला येण्याची उत्कट इच्छा झाली पण आज माझे घोडे येथें नाहींत म्हणून मला येतां येत नाहीं. व म्हणूनच मी माझ्या मुलाला आतांच शिर्डीस पाठविला आहे. " त्यावर मी म्हटलें "म्हणूनच महाराजांनीं मला टांगा घेऊन पाठविलें आहे. आपण येत असलांत तर माझा टांगा तयार आहे. " त्यावर ते मोठ्या आनंदानें मजबरोबर आले.

साहेब येथें नाहीं दूसरा । कशास व्हावी इतुकी त्वरा ॥
जा खा भाकर तुकडा जरा । जाई दुपारा जेउनी ॥ १४२ ॥

ऐशी कोणाची आहे आज्ञा । कीं त्या वाणीचीं करील अवज्ञा ॥
लहाना थोरा शहाण्या सुज्ञा । अनुभव विज्ञान सकळां हें ॥१४३॥

ज्यानें ज्यानें आज्ञा मानिली । गाडी तयाची कधीं न चुकली ॥
परी जयानें ती अवमानिली । प्रचीती घेतली रोकडी ॥ १४४ ॥

एकामागून एक अभिनव । संख्या विरहीत ऐसे अनुभव ॥
अनेकांचे अनेक अपूर्व । संक्षेप पूर्वक सांगेन ॥ १४५ ॥

हेमाड साईपदीं शरण । पुढील अध्यायीं हेंचि निरूपण ॥
भक्त परततां गांवालागून । बाबांचे आज्ञापन हों लागे ॥१४६॥

आज्ञा होई तो तो जाई । आज्ञा नाहीं तो तो राही ॥
अवमानितां पडे अपायीं । पुढील अध्यायीं दिग्दर्शन ॥ १४७ ॥

तैसेंच मधुकरी वृत्तीचें धारण । साईस किमर्थ भिक्षान्न सेवन ॥
पंचसूनादि पातक क्षालन । कथा निरूपण पुढारा ॥ १४८ ॥

म्हणवून श्रोतयां चरणीं प्रार्थना । करितों आग्रहें क्षणक्षणा ॥
कराया साईचरित्र श्रवणा । निजकल्याणा कारणें ॥ १४९ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
साईसमर्थ सच्चरिते । साईसमर्थावतरणं
नाम अष्टमोध्यायः ॥ १५० ॥

श्री सद्गुरुसाईनाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० आ० भिष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारी पद्यें,, व भजनकाळी म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भिष्म यांनी तयार केलेलीं पद्ये, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस

रा रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, बांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी., पो. राहते, जि. अहमदनगर.

# आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवि दासगणू महाराजांचीहि प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. कि. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किंमतीस पुस्तक मिळेल.

एकदम सहा पुस्तकांची कि. प्र. फी. सह ३ रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

---

# श्री साईनाथ भजनमाला.

**सुधारून वाढविलेली आवृत्ती.**

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनी माला मागविण्याची त्वरा करावी कारण प्रती फारच थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

[illegible]

श्रीपति सावित्रीबाई तेंडुलकर.

[illegible]

[illegible]

बी. जी. सी. [illegible]



[illegible]

[illegible] अनंत आत्माराम मोरमकर [illegible]

रा. आ. नर्मदा [illegible]

[illegible]